<u>प्रेस नोट दिनांक ०१/०६/२०१८</u>

# MIDC भोसरी पोलीस ठाणे पोलीसांची कामगिरी

## ट्रक, डंपर चोरणारे सराईत चोरटे एमआयडीसी भोसरी पोलीसांनी जेरबंद करुन त्यांचेकडून ८ गुन्हे उघडकीस आणून त्यांचेकडून किं १४,७५,५७५/- रुचा मुद्देमाल हस्तगत

---

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी रमजान महिन्या निमित्त पोलीस ठाणे हद्दीत शांतता रहावी म्हणून पेट्रोलिंग फिरत असतांना त्यांना सराईत चोरटा सचिन पवार हा त्याचे एका साथीदारासह आदर्शनगर, मोशी, पुणे येथे आला असल्याबाबत माहिती मिळाल्याने सापळा रचून १)सचिन धनराज पवार वय-२५ वर्षे रा. आदर्शनगर, सुर्योदय हॉटेलचे मागे, मोशी, पुणे २) अक्षय उर्फ बंटी दत्तू कांबळे वय-२१ वर्षे रा. बारणेवस्ती, रामदास बारणे यांचे खोलीत, मोशी, पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून कसून चौकशी करुन किंमत रुपये १३,४५,५७५/- रुचे एक टाटा कंपनीचा १६१३ मॉडेल डंपर, एक टाटा कंपनीचा ९०९ मॉडेलचा टेम्पो, एक हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल व १६ तेलाचे डबे तसेच कॉपरचे ताराचे तुकडे वजन अंदाजे २० किलो असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांचेकडून एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, निगडी कडील प्रत्येकी एक गुन्हा व पुणे ग्रामीण मधील चाकण, लोणीकंद पोलीस ठाणेकडील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आले आहेत. तसेच सचिन पवार याचेच साथीदार नामे १) निलेश सुनिल पवार वय-२३ वर्षे रा. आदर्शनगर, मोशी,पुणे २) करन कुमार जाधव वय- २३ वर्षे रा. वडगाव रोड, विश्रांतवडाचे बाजूला, आळंदी, पुणे यांना एम आय डी सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न.१३६/२०१८ भा द वि कलम ३७९ मध्ये याच महिन्यात अटक करुन त्यांच्याकडुन पिंपरी पोलीस स्टेशन कडील दोन वाहन चोरीचे व विश्रांतवाडी पोलीस स्टेशन कडील एक वाहनचोरीचा असे एकुण ४ गुन्हे उघडकिस आणुन त्यांच्याकडुन एकुण १,३०,०००/- रुपये किमतीच्या चार मोटरसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

वरील चारही आरोपींकडून किं रु १४,७५,५७५/- रुपये चे एक टाटा कंपनीचा १६१३ मॉडेल डंपर, एक टाटा कंपनीचा ९०९ मॉडेलचा टेम्पो, ०५ मोटार सायकल व १६ तेलाचे डबे तसेच कॉपरचे ताराचे तुकडे वजन अंदाजे २० किलो अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी ही मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. प्रदिप देशपांडे, मा.पोलीस उपायुक्त, श्री गणेश शिंदे तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. सतीश पाटील यांचे मार्गदर्शनाखाली **MIDC** भोसरी पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भिमराव शिंगाडे, तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक रावसाहेब बांबळे, पोलीस हवालदार अजय भोसले

रविंद्र तिटकारे, पोलीस नाईक किरण काटकर, पोलीस शिपाई नवनाथ पोटे विजय दौंडकर, अमोल निघोट व करन विश्वासे, विशाल काळे, राजेंद्र जाधव यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब बांबळे हे करीत आहेत.

---